# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.
## ४१२ ई शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.
**दुरध्वनी क्रमांक.** ०२० २५६५६२३४, **ईमेल** ropune@dtemaharashtra.gov.in

जा.क्र.तंशि/विकापु/लेखा १/२०१९/ 3315 दिनांक - 09 AUG 2019

अत्यंत महत्वाचे व कालमर्यादित.

प्रति,
प्राचार्य,
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये/औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये
शासकीय तंत्र निकेतने, पुणे विभाग, पुणे.

विषय - सन २०२०-२१ चे अर्थसंकल्पीय अंदाज आणि सन २०१९-२० सुधारीत अंदाज (अनिवार्य खर्च) प्रस्ताव पाठविणेबाबत.
(मुख्य लेखाशिर्ष २२०३ तंत्र शिक्षण, मागणी क्रं. डब्ल्यू -३) (अनिवार्य खर्च)

संदर्भ - ०१.तंत्रशिक्षण संचालनालयाचे पत्र क्र. १५/अर्थसं/अर्थ.अंदाज/२०१९-२०/५८ दिनांक ०८/०८/२०१९
०२. तंत्र शिक्षण संचालनालय,मुंबई येथील कार्यासन क्रं.१५ येथील दिनांक ०९/०८/२०१९ चा दूरध्वनी संदेश.

उपरोक्त विषयाबाबत संदर्भिय पत्र व त्यासोबत सन २०२०-२१ चे अर्थसंकल्पीय अंदाज व सन २०१९-२० सुधारीत अंदाज सादर करावयाचे वेळापत्रक जोडण्यात आलेले आहे.

संचालनालयाकडून प्राप्त पत्र व त्यासोबत विवरणपत्रे याचा ईमेल आपणा सर्व संस्थांना दिनांक ०८/०८/२०१९ रोजी पाठविण्यात आलेला आहे.

तरी सर्व संस्थाप्रमुखांना कळविण्यात येते की, सन २०२०-२१ चे अर्थसंकल्पीय अंदाज आणि सन २०१९-२० सुधारीत अंदाजपत्रक तयार करतांना **संचालनालयाचे संदर्भिय पत्रातील सूचनाचे पालन करून अंदाजपत्रक तयार करण्यात यावे.**

संदर्भ क्रमांक ०२ प्राप्त दूरध्वनी सूचनानुसार सद्यस्थिती शिक्षकीय पदांना सहाव्या वेतन आयोगानुसार वेतन अदा करण्यात येत आहे. परंतु अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने सातवा वेतन आयोगाच्या अनुषंगाने अधिसूचना निर्गमित केलेली आहे. **तरी सर्व संस्थाप्रमुखांना कळविण्यात येते की, केवळ सन २०२०-२१ अर्थसंकल्पीय अंदाज व सन २०१९-२० चे सुधारीत अंदाजपत्रक तयार करण्यासाठी आपल्या संस्थेतील कार्यरत सर्व शिक्षकीय पदांची सातव्या वेतन आयोगानुसार ०१/०१/२०१६ रोजीची तात्पुरती वेतननिश्चिती करण्यात येवून सन २०१९-२० व २०२०-२१ मध्ये अंदाजे काय वेतन घेतील त्यानुसार अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक तयार करण्यात यावे.**

तसेच अंदाजपत्रक तयार करतांना पदांच्या आढाव्यानुसार व त्यानंतरच्या शासन निर्णयान्वये वेळोवेळी मंजूर झालेल्या पदांप्रमाणे स्थायी/अस्थायी तसेच वर्ग निहाय पदे जुळवून, शासनाने मंजूर केलेल्या पदांचे व शासनामार्फत नियुक्त केलेल्या पदांचे, अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये अंतर्भूत करून पद निर्मितीचे शासन निर्णयाच्या प्रतीसह, विहीत प्रपत्रात योजनानिहाय सीआरसी व्हाईस कमी/जास्त खर्चाबाबत स्पष्टीकरणासह अर्थसंकल्पीय अंदाज तयार करावे. तयार झालेले अंदाजपत्रक **सर्व संस्थाप्रमुखांनी स्वत: तपासणी करून बरोबर असल्याची खात्री करूनच ज्या कर्मचा-यांनी अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक तयार केलेले आहे त्यांनीच या विभागीय कार्यालयास ऑगस्ट २०१९ अखेर सादर करावे.** विभागीय कार्यालयाने तपासणी केल्यानंतर संचालनालयाने ठरवून दिलेल्या वेळापत्रकानुसार संचालनालयास सादर करण्यात यावे.

सोबत - संदर्भिय पत्र व वेळापत्रक

(स्वाक्षरी)
प्र.सहसंचालक, करीता.
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,पुणे

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७, मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, ३०२३३४७९/८४

E-Mail :- desk15@dtemaharashtra.gov.in internet:- http://www.dte.maharashtra.gov.in


अत्यंत महत्वाचे

क्रमांक : १५/अर्थसं/अर्थ.अंदाज/२०१९-२०/ ५८

दिनांक : 8 AUG 2019

प्रति,

१) सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालये,
मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर

२) संचालक/प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी/औषधनिर्माण शास्त्र महाविद्यालये

३) प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतने

विषय :- सन २०२०-२१ चे अर्थसंकल्पीय अंदाज आणि सन २०१९-२० सुधारीत अंदाज (अनिवार्य खर्च) प्रस्ताव पाठविणेबाबत...
(मुख्य लेखाशिर्ष २२०३ - तंत्रशिक्षण, मागणी क्र. डब्ल्यू-३) (अनिवार्य खर्च)

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते कीं, सन २०२०-२१ अर्थसंकल्पीय अंदाज आणि सन २०१९-२० सुधारीत अंदाज सादर करणे आवश्यक आहे. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालये, शासकीय अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये व शासकीय तंत्रनिकेतने व तत्सम संस्थांचा खर्च भागविण्यासाठी शासनाकडून तरतूद उपलब्ध करुन घेण्यासाठी, अर्थसंकल्पीय अंदाज तयार करताना सदरहू पदांच्या आढाव्यानुसार व त्यानंतरच्या शासन निर्णयान्वये वेळोवेळी मंजूर झालेल्या पदांप्रमाणे, स्थायी / अस्थायी तसेच वर्ग निहाय पदे जुळवून शासनाने मंजूर केलेल्या पदांचे व शासनामार्फत नियुक्त केलेल्या पदांचे अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये अंतर्भूत करुन (पद निर्मीतीचे शासन निर्णयाच्या प्रतीसह) सोबत जोडलेल्या विहित प्रपत्रात योजनानिहाय (CRC Wise) अर्थसंकल्पीय अंदाज तयार करुन संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांनी सोबत जोडलेल्या वेळापत्रकानुसार प्रत्यक्ष उपस्थित रहावे.

तसेच सदरहू अर्थसंकल्पीय अंदाज तयार करतांना खालील बाबी लक्षात घेऊन अंदाजपत्रक तयार केलेले असावे.

१. संबंधित विवरणपत्रातील आकडेवारी हजारात दर्शविण्यात यावेत.(पूर्ण रुपयात आकडेवारी सादर करण्यात येऊ नये)

२. रिक्त असलेल्या स्थायी/ अस्थायी पदांसाठी मूळ वेतनाचे १० टक्के प्रमाणे परिगणना करुन तसेच ७ व्या वेतन आयोगानुसार संभावित महागाई भत्ता सन २०१९-२० करीता सुधारीत अंदाजासाठी २०% व सन २०२०-२१ करीता अर्थसंकल्पीय अंदाजासाठी २५% दराने वाढ गृहित धरुन अंदाजपत्रक सादर करावे.

३. संबंधित उपलेखाशिर्षातील उद्दिष्ट निहाय परिगणना करुन अंदाजपत्रक सादर करावे. (अंदाजीत आकडेवारी सादर करण्यात येऊ नये.)

४. शासकीय स्वायत्त संस्थेला कळविण्यात येते की, शासनाने मंजूर केलेल्या पदांचे व शासनामार्फत नियुक्त केलेल्या अधिकारी/ कर्मचारी यांच्या वेतनावरील खर्च भागविण्यासाठी अंदाजपत्रकात तरतूद करण्यात यावी. ( संबंधित संस्थेच्या नियामक मंडळाने नियुक्त केलेल्या अधिकरी/कर्मचारी यांच्या वरील खर्चासाठी अंदाजपत्रकात अंतर्भूत करण्यात येऊ नये.)

५. शासकीय अभियांत्रिकी / औषधनिर्माण शास्त्र महाविद्यालये व शासकीय तंत्रनिकेतने व तत्सम संस्था (पदवी व पदविका) संस्थेला कळविण्यात येते की, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने दिनांक ०१ मार्च, २०१९ रोजी निर्गमित केलेले राजपत्रात नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या आधिन राहून अर्थसंकल्पीय अंदाज तयार करुन सादर करावे.

६. पदांच्या आढाव्यानुसार वर्ग-४ साठी मंजूर असलेल्या पदांचा खर्च भागविण्यासाठी अंदाजपत्रकात तरतूद करण्यात यावी. (मंजूर पदे वगळून कंत्राटी सेवा (१०) या उद्दिष्टांतर्गत सुरक्षा रक्षक, माळी, सफाईगार, वाहन चालक इत्यादी पदांचा सेवा बाहयंत्रणेकडून काम करुन घेण्याबाबत शासन निर्णयानुसार मार्गदर्शक सूचना विचारात घेऊन संबंधित विभागाची/प्रशासकीय विभागाची मंजूरी शिवाय यावर होणा-या खर्चासाठी अंदाजपत्रकात नमूद करण्यात येऊ नये.) प्रशासकीय विभागाची मंजूरी असल्यास सदरहू आदेश सोबत जोडावे.

७. सामग्री व पुरवठा (२१) या उद्दिष्टांवरील खर्च भागविण्यासाठी खरेदी विषयक संबंधिचे आवश्यक कागदपत्रांची पुर्तता करुन अंदाजपत्रकासोबत जोडावे.

८) व्यावसायिक सेवा (२८) या उद्दिष्टांवरील खर्च भागविण्यासाठी संबंधित संस्थेसाठी एकूण मंजूर केलेल्या शिक्षकीय पदांपैकी रिक्त असलेल्या पदांचे अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने दिलेल्या अधिभारानुसार परिगणना करुन सोबत जोडलेल्या विवरणपत्रात आकडेवारी नमूद करुन अंदाजपत्रक सादर करण्यात यावेत.

९) ज्या पदनामाना ७ वा वेतन आयोग लागू केला नसेल, त्या पदनामांचे ६ व्या वेतन आयोगानुसारच अंदाज पत्रक सादर करण्यात यावे.

१०) अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकाची प्रत संबंधित सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय यांचे कडे तपासणी/ प्रमाणित करुन सादर करावी.

सोबत :- विवरणपत्रे

(डॉ. अभय वाघ)
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा. मुंबई.

प्रत: माहिती व पुढील कार्यावाहीसाठी -

१) आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, मुंबई. २) सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई. ३) सचिव, प्रवेश नियामक प्रधिकरण, मुंबई. यांना कळविण्यात येते की, सदरहू अंदाजपत्रक विहित मुदतीत सादर करण्यात यावे.

४) संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई -५१ यांना कळविण्यात येते की, आपले व आपल्या अधिपत्याखालील विभागीय तंत्रशिक्षण परिक्षा मंडळाचे अर्थसंकल्पीय अंदाजाची माहिती संकलीत करुन या कार्यासनाकडे विहित मुदतीत सादर करण्यात यावे.

५) लेखा अधिकारी, का.क्र.६, मुख्य कार्यालय, मुंबई यांना कळविण्यात येते की, या संचालनालयातील विविध कार्यासनातील अर्थसंकल्पीय अंदाजाची माहिती संकलीत करुन या कार्यासनाकडे विहित मुदतीत सादर करण्यात यावे.

६) कार्यासन अधिकारी, का.क्र. ७, मुख्य कार्यालय, मुंबई यांना कळविण्यात येते की, अशासकीय अनुदानित पदवी व पदविका व तत्सम संस्थाची अर्थसंकल्पीय अंदाजाची माहिती संकलीत करुन या कार्यासनाकडे विहित मुदतीत सादर करण्यात यावे.

७) कार्यासन अधिकारी, का.क्र. १६, मुख्य कार्यालय, मुंबई यांना कळविण्यात येते की, शासकीय अधिकारी /कर्मचारी इत्यादीना कर्जे उपलब्ध करुन देण्यासाठी अर्थसंकल्पीय अंदाजाची माहिती संकलीत करुन या कार्यासनाकडे विहित मुदतीत सादर करण्यात यावे.

तसेच उपरोक्त निर्देशित केल्यानुसार विहित मुदतीत माहीती सादर न केल्यास अनुदानाबाबत अडचणी निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी संबंधित कार्यासनाची राहील.

**परिशिष्ट -अ**

**सन 2020-21 चे अर्थसंकल्पीय अंदाज व सन 2019-20 सुधारीत अंदाज सादर करावयाचे वेळापत्रक**

| अंदापत्रक सादर करावयाची तारीख | अ.क्र. | संस्थेचे नाव | वेळ |
|---|---|---|---|
| दिनांक 16/09/2019 | 1 | शासकीय तंत्रनिकेतन, अमरावती | सकाळी 10.00 |
| | 2 | शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती | सकाळी 11.00 |
| | 3 | शासकीय तंत्रनिकेतन, अचलपूर | दुपारी 12.00 |
| | 4 | शासकीय तंत्रनिकेतन, खामगाव | दुपारी 02.00 |
| | 5 | सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती | दुपारी 02.00 |
| दिनांक 17/09/2019 | 1 | शासकीय औषधनिर्माणशास्त्र महा. अमरावती | सकाळी 10.00 |
| | 2 | शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन, यवतमाळ | सकाळी 11.00 |
| | 3 | शासकीय तंत्रनिकेतन, वाशिम | दुपारी 12.00 |
| | 4 | शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, यवतमाळ | दुपारी 02.00 |
| | 5 | शासकीय तंत्रनिकेतन, मुर्तिजापूर | संध्या. 03.00 |
| दिनांक 18/09/2019 | 1 | सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर | सकाळी 10.00 |
| | 2 | शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, नागपूर | सकाळी 11.00 |
| | 3 | शासकीय तंत्रनिकेतन, नागपूर | दुपारी 12.00 |
| | 4 | शासकीय तंत्रनिकेतन, ब्रम्हपूरी | दुपारी 02.00 |
| | 5 | शासकीय हॉटेल मॅनेजमेंट, नागपूर | संध्या. 03.00 |
| दिनांक 19/09/2019 | 1 | शासकीय तंत्रनिकेतन, गडचिरोली | सकाळी 10.00 |
| | 2 | शासकीय तंत्रनिकेतन, आर्वी | सकाळी 11.00 |
| | 3 | शासकीय तंत्रनिकेतन, साकोली | दुपारी 12.00 |
| | 4 | शासकीय तंत्रनिकेतन, गोंदिया | दुपारी 02.00 |
| | 5 | शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, चंद्रपूर | संध्या. 03.00 |
| दिनांक 20/09/2019 | 1 | सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नाशिक | सकाळी 10.00 |
| | 2 | शासकीय तंत्रनिकेतन, नाशिक | सकाळी 11.00 |
| | 3 | शासकीय तंत्रनिकेतन, धुळे | दुपारी 12.00 |
| | 4 | शासकीय तंत्रनिकेतन, अहमदनगर | दुपारी 02.00 |
| | 5 | शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, जळगाव | दुपारी. 12.00 |
| | 6 | शासकीय तंत्रनिकेतन, जळगाव | संध्या. 04.00 |
| दिनांक 21/09/2019 | 1 | सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद | सकाळी 10.00 |
| | 2 | शासकीय औषधनिर्माणशास्त्र महा. औरंगाबाद | सकाळी 11.00 |
| | 3 | शासकीय तंत्रनिकेतन, औरंगाबाद | दुपारी 12.00 |
| | 4 | शासकीय तंत्रनिकेतन, अंबड | दुपारी 02.00 |
| | 5 | शासकीय तंत्रनिकेतन, जिंतूर | संध्या. 03.00 |

| | | | |
|---|---|---|---|
| दिनांक 23/09/2019 | 1 | शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद | सकाळी 10.00 |
| | 2 | शासकीय तंत्रनिकेतन, नांदेड | सकाळी 10.00 |
| | 3 | शासकीय तंत्रनिकेतन, जालना | सकाळी 11.00 |
| | 4 | शासकीय तंत्रनिकेतन, उस्मानाबाद | दुपारी 12.00 |
| | 5 | शासकीय तंत्रनिकेतन, बीड | दुपारी. 02.00 |
| | 6 | शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन, लातूर | संध्या. 03.00 |
| | 7 | शासकीय तंत्रनिकेतन, लातूर | संध्या. 04.00 |
| दिनांक 24/09/2019 | 1 | सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे | सकाळी 10.00 |
| | 2 | शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे | सकाळी 11.00 |
| | 3 | शासकीय दुरशिक्षण , पुणे | दुपारी 12.00 |
| | 4 | शासकीय तंत्रनिकेतन, पुणे | दुपारी 02.00 |
| | 5 | शासकीय हॉटेल मॅनेजमेंट, पुणे | संध्या. 03.00 |
| | 6 | शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन, तासगांव | संध्या. 04.00 |
| दिनांक 25/09/2019 | 1 | शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अवसरी | सकाळी 10.00 |
| | 2 | शासकीय तंत्रनिकेतन, अवसरी | सकाळी 11.00 |
| | 3 | शासकीय तंत्रनिकेतन, कराड | दुपारी 12.00 |
| | 4 | शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड | सकाळी 11.00 |
| | 5 | शासकीय तंत्रनिकेतन, मिरज | संध्या. 03.00 |
| | 6 | शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर | संध्या. 04.00 |
| | 7 | शासकीय तंत्रनिकेतन, सोलापूर | सकाळी 10.00 |
| | 8 | शासकीय औषधनिमाणशास्त्र मह., कराड (पदावी व पदविका) | दुपारी 12.00 |
| दिनांक 26/09/2019 | 1 | सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई | सकाळी 10.00 |
| | 2 | शासकीय औषधनिमर्माण शास्त्र महा. रत्नागिरी | सकाळी 11.00 |
| | 3 | शासकीय तंत्रनिकेतन, मुंबई | दुपारी 12.00 |
| | 4 | शासकीय तंत्र मुद्रण संस्था, मुंबई | दुपारी 02.00 |
| | 5 | शासकीय तंत्रनिकेतन, पेण | संध्या. 03.00 |
| | 6 | शासकीय तंत्रनिकेतन, ठाणे | संध्या. 04.00 |
| दिनांक27/09/2019 | 1 | तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई | सकाळी 10.00 |
| | 2 | शासकीय तंत्रनिकेतन, मालवण | सकाळी 11.00 |
| | 3 | शासकीय तंत्रनिकेतन, रत्नागिरी | दुपारी 12.00 |
| | 4 | महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण परीक्षा मंडळ, मुंबई व तंत्रशिक्षण परीक्षा मंडळ विभागीय कार्यालये, मुंबई, पुणे, औरंगाबाद व नागपूर | सकाळी 11.00 |
| | 5 | शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई | दुपारी.12.00 |
| | 6 | प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई | दुपारी 02.00 |
| | 7 | राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, मुंबई | दुसंध्या. 03.00 |

**टिप:- वरील नमूद दिनांक व दिलेल्या वेळेचे पालन करुनच अंदाजपत्रक सादर करण्यात यावे.**